**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 05.07.2024** **वार – शुक्रवार**

---

**मतदार यादी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यात छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर झाला आहे; नागरिकांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केलं आहे. या उपक्रमांतर्गत एकत्रिकृत प्रारुप मतदार यादी 25 जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पुनरीक्षण मोहीम कालावधीत नवीन मतदारांची नाव नोंदणी करणे, मृत मतदारांचे, स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळणे आदी कार्यक्रम राबवले जातील. जिल्ह्यात 18 ते 19 वयोगटातील युवकांचा मतदार प्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी महाविद्यालयात मतदार नोंदणीसाठी विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. नागरिकांनी मतदार यादीत ऑनलाईन नावनोंदणीसाठी किंवा तपशीलात बदल करण्यासाठी https://voters.eci.gov.in या संकेतस्थळाला किंवा वोटर हेल्पलाईन या मोबाईल ॲपला भेट द्यावी. असं  आवाहनही दिवसे यांनी केलं आहे.

**मुख्यमंत्री-लाडकीबहीण**

मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज करण्यासाठी येत्या 31 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. 21 ते 65 वर्षे वयागटातील सर्व पात्र महिलांनी या योजनेसाठी अर्ज करावेत असं आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी केलं आहे. या योजने अंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना 1 जुलै 2024 पासून दरमहा 1500 रुपये आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.

**बियाणांचा पुरवठा**

राज्यात खरीप हंगामातील पिकांच्या पेरण्याखाली क्षेत्र 142 लाख 38 हजार हेक्टर आहे. यासाठी 19 लाख क्विंटल बियाण्याची गरज असून प्रत्यक्षात त्यापेक्षा अधिक म्हणजे 25 लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहेत. जूनअखेर राज्यात 19 लाख 41 हजार 136 क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आल्याची माहिती पुणे कृषी विभाग संचालक विकास पाटील यांनी दिली.

**pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाकडे या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये 432 कोटी रुपयांचा मालमत्ता कर संकलित झाला आला. शहरामध्ये निवासी, औद्योगिक अशा एकंदर 6 लाख 30 हजारांहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत, यावर्षी त्यापैकी 54 टक्के करदात्यांनी पहिल्या तिमाहीमध्येच मालमत्ताकर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. 73 टक्के करदात्यांनी ऑनलाइन स्वरूपात कर भरला आहे.

**अपघात मुक्तवारी**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी भाविकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागृती व्हावी यादृष्टीने 'अपघातमुक्त वारी' अभियानाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी ही माहिती दिली. या अभियानात आळंदी रोड, दिवे कार्यालयामध्ये टाळ मृदुंगाच्या साथीने वारकऱ्यांमध्ये रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम, वेग नियंत्रण आदीबाबत जागर करण्यात आला. रस्ता सुरक्षेबाबत संदेश असणाऱ्या कापडी पिशव्या, रेनकोट वारकऱ्यांना वितरीत करण्यात आले. वाटप करण्यात आले.

**पर्यटन**

पावसाळ्याच्या हंगामात लोणावळा, मुळशी आदी परिसरात धबधब्यांच्या ठिकाणी होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी केवळ धोक्याच्या सूचना देणारे फलक लावून उपयोग नाही, तर कडक नियमावली, पोलिस बंदोबस्त किंवा धोक्याच्या ठिकाणी जाण्यास बंदी घालून अतिउत्साही पर्यटकांना रोखावं अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे. लोणावळा परिसरात गेल्या सहा वर्षांत अशा दुर्घटनांमध्ये 53 जणांचा बळी गेल्याचं स्थानिक पोलिसांनी म्हटलं आहे.

**निधन**

पुण्यातील प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अरुंधती सरदेसाई यांचं गेल्या महिन्यात 27 तारखेला अमेरिकेतल्या फिलाडेल्फिया इथं निधन झालं; त्या 80 वर्षांच्या होत्या. मानव्य या संस्थेसह अनेक सामजिक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. साहसी गिर्यारोहणाची त्यांना आवड होती.

**क्रीडा**

पुण्यात सुरू असलेल्या मान्सून करंडक आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत एलिट ईगल्स् ॲकॅडमीने पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा 2 गडी राखून पराभव करत सलग दुसरा विजय मिळवला. तर अन्य एका

सामन्यात जोशी स्पोटर्स संघाने रूद्रप्रतिष्ठान क्रिकेट ॲकॅडमीचा 5 गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. उद्याही शहर आणि परिसरात हलक्या ते मध्यम पावसाचा तर घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**